मराठी व्याकरणावर अध्ययन प्रभुत्व मिळविण्यासाठी बहुमाध्यमाधारित अध्ययन संचाचे विकसन व परिणामकारकता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवीच्या अंशतः पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

कवठेकर अनिल सदाशिव

मार्गदर्शक

प्रा. डॉ.बाविस्कर चंद्रकांत राघो

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्च 2022

प्रस्तावना

दोन व्यक्ती मध्ये होणारा संवाद हा भाषेच्या माध्यमातून होतो. भाषेत असलेल्या ध्वनिंचा एक विशिष्ट अर्थ असतो. म्हणजेच व्याकरण हे ध्वनि, शब्द, वाक्य आणि इतर घटक तसेच त्यांचे संयोजन आणि व्याख्या नियंत्रित करणारे भाषेचे नियम होय.

नियम हे भाषेचे स्वरूप शुद्ध ठेवतात, म्हणजेच मराठी भाषेचे व्याकरण हे स्पष्टीकरण करणारे शास्त्र आहे. मातृभाषेमध्ये बोलणे शिकण्याची आवश्यकता नसते. श्रवण प्रक्रियेतून भाषा तिच्या व्याकरणासह सहजपणे शिकली जाते, आणि व्याकरणशुद्ध बोलली ही जाते. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत खरी समस्या ही आहे की, त्या व्याकरणाला नेमके काय व का म्हणतात हे समजणे कठीण वाटते.

या भाषेची रचना आणि प्रणाली किंवा सामान्यता भाषा वाक्यरचना यांचा समावेश असणारे आकार विज्ञान म्हणजे व्याकरण होय. शब्द वाक्य आणि वाक्यांमध्ये कोणतीही सामान्यतः बोलली जाणारी भाषा निश्चित नसते. ती काळानुसार बदलते. ज्याला आपण व्याकरण असे म्हणतो.

व्याकरणाच्या आणखी काही व्याख्या पाहताना लक्षात येते की, व्याकरण म्हणजे वाक्य तयार करण्यासाठी शब्द एकत्र ठेवण्याचे मार्ग होय. व्याकरण हे भाषेच्या नियमांचे वर्णन करणारे पुस्तक आहे. ज्यात विशिष्ट व्याकरण हा विशिष्ट सिद्धांत आहे. ज्याचा उद्देश भाषेचे नियम स्पष्ट करणे होय.

शालेय अध्ययन अध्यापनात व्याकरणाचे अध्ययन सहज-सोप्या पद्धतीने होणे आवश्यक आहे.

ब्लूम यांच्यामते, अध्ययनाला लागणारा वेळ, चिकाटी, अभियोग्यता, अध्यापनाचा दर्जा आणि विद्यार्थी आकलन क्षमता या सर्व घटकांचा परिपाक म्हणजे अध्ययन प्रभुत्व होय.

कोमिनियन व कॅरोल यांच्यामते विद्यार्थ्याला अध्यायात दिलेला पुरेसा वेळ आणि प्रत्यक्ष विद्यार्थ्याने अध्ययनाला दिलेला वेळ यांच्या गुणोत्तराच्या प्रमाणात घडणारे अध्ययन म्हणजे अध्ययन प्रभुत्व होय.

मराठीच्या व्याकरणाचा अभ्यास करताना विद्यार्थ्यास अभ्यासाला दिलेल्या वेळे त्यास पूर्णपणे वापरता यावा. यासाठी काही तंत्रांची आवश्यकता आहे. ज्याला आपण अध्यापन तंत्र असे म्हणतो. या संशोधनात संशोधक बहुमाध्यम तंत्राचा उपयोग करून विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादनाचा अभ्यास करणार आहे.

बहुमाध्यम: दूरचित्रवाणी, रेडिओ, आकाशवाणी, संदेश (इंटरनेट) या सर्व माध्यमाद्वारे तसेच लिखित माध्यमातील साहित्य, मुद्रित स्वरूपात देण्याचे माध्यम म्हणजे बहुमाध्यम होय. तसेच लिखित साहित्याचे मुद्रित साहित्य रूपांतर करून, संप्रेषण साधणारे किंवा माहितीचे आदान-प्रदान करणारी सर्व प्रकारची साधने म्हणजेच बहुमाध्यम होय.

बहुमाध्यमामुळे, ज्ञान हे शब्द आणि ग्राफिक्स मध्ये बदलत आहे. माहिती तंत्रज्ञानात माहिती उपलब्ध करण्यासाठी ज्या विविध साधनांचा उपयोग केला जातो त्या सर्व प्रकारच्या साधनांना व माध्यमे म्हणतात.

माध्यमांच्या या विविध वैशिष्ट्यांचा उपयोग करून विद्यार्थी मराठी व्याकरणावर अध्ययन प्रभुत्व प्राप्त करू शकतील अशा अध्ययन संचाची निर्मिती या संशोधनात केली जाणार आहे.

संशोधनाची गरज

संशोधनाची गरज पुढीलप्रमाणे.

1) विद्यार्थी मराठीच्या व्याकरणाच्या अध्ययनाकडे दुर्लक्ष करतात.

2) व्याकरण हाअवघड विषय आहे, असे विद्यार्थ्यांना वाटते.

3) विद्यार्थी व्याकरणाच्या आकलनापेक्षा व्याकरणाच्या पाठांतरावर भर देतात.

4) विद्यार्थ्यांना मराठी गद्य आणि पद्य पाठाइतके व्याकरण रंजक आणि सोपे वाटत नाही.

5)व्याकरणाचा अभ्यास केला नाही तरी, फार अडचण येत नाही. असा विद्यार्थ्यांचा गैरसमज आहे.

6) व्याकरणाचे सामान्यीकरण शिक्षक करीत नाहीत.

7) विद्यार्थ्यांनी व्याकरण शिकावे म्हणून शिक्षक विशेष प्रयत्न करीत नाहीत.

8)अनेक वेळा शिक्षक घाईघाईत व्याकरणाचा अभ्यासक्रम पूर्ण करतात.

9) इतर विषयाप्रमाणे व्याकरणाचा सराव घेतला जात नाही.

10) शिक्षक मनोरंजक पद्धतीने व्याकरणाचे अध्यापन कसे करावे याचा विचार करीत नाहीत.

संशोधनाचे महत्त्व

१) बहुमाध्यमाधारित अध्ययन संचामुळे मराठीच्या व्याकरण अध्ययनात रंजकता येऊन ते सोपे होण्यास मदत होईल.

2) मराठी व्याकरणाचे बहुमाध्यम अध्ययन   संचाने अध्ययन-अध्यापन केल्याने विद्यार्थ्यांना व्याकरणाच्या संकल्पनांचे सामान्यीकरण करणे शक्य होईल.

3) मराठी व्याकरणाचे अध्ययन -अध्यापन बहुमाध्यम अध्ययन   संचाने करणे हे नाविन्यपूर्ण असेल.

4) बहुमाध्यम अध्ययन संचामुळे मराठी व्याकरणाचे अध्ययन करणे सोपे होईल.

5) बहुमाध्यम अध्ययन संचाने मराठीचे व्याकरण विद्यार्थी स्वप्रयत्नाने करण्यास प्रवृत्त होतील.

अशा प्रकारचे संशोधन झालेले नाही, म्हणून मराठी व्याकरणाच्या अध्ययन - अध्यापनात एक नव्या अध्यापन पद्धतीची भर पडेल. ज्याची आज आवश्यकता आहे. या सर्वांचा विचार करूनच हे संशोधन करण्यात आलेले आहे.

समस्या विधान

मराठी व्याकरणावर अध्ययन प्रभुत्व मिळविण्यासाठी

बहुमाध्यमाधारित अध्ययन संचाचे

विकसन व परिणामकारकता

कार्यात्मक व्याख्या

मराठी व्याकरण: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अनुसार पूर्वमाध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील व्याकरणाचे घटक म्हणजे मराठी व्याकरण होय.

अध्ययन - अध्यापन प्रभुत्व: पूर्व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांवर प्रयोगानंतर त्यांच्या शैक्षणिक संपादनात होणारा सकारात्मक बदल म्हणजे अध्ययन-अध्यापन प्रभुत्व होय.

बहुमाध्यम: पूर्वमाध्यमिक स्तरावरील मराठी व्याकरणाच्या घटकावर बहूमाध्यमाधारित असलेली नाविन्यपूर्ण अध्ययन-अध्यापन पद्धती म्हणजे बहुमाध्यम होय.

अध्ययन संच विकसन: म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये रंजकता निर्माण करून विषयाचे सामान्यीकरण करण्यास मदत करणारी अध्ययन संच होय.

संशोधनाची उद्दिष्टे

1) पूर्वमाध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी व्याकरणावर असलेल्या अध्ययन प्रभुत्वाचा शोध घेणे .

2) पूर्वमाध्यमिक स्तरावर मराठी व्याकरण अध्यापनाच्या सद्यस्थितीचा शोध घेणे.

3) पूर्वमाध्यमिक स्तरावर मराठी व्याकरणावर अध्ययन प्रभुत्व मिळवण्यासाठी बहुमाध्यम आधारित अध्यापन संचाचे विकसन करणे.

4) पूर्वमाध्यमिक स्तरावर मराठी व्याकरणावर प्रभुत्व मिळवण्यासाठी बहुमाध्यम आधारित अध्ययन संचाची परिणामकारकता तपासणे .

5) बहुमाध्यमावर आधारित मराठी व्याकरण अध्ययन संचाबाबत विद्यार्थी व शिक्षकांची मते जाणून घेणे.

संशोधनाची गृहितके

1) पूर्वमाध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मराठी व्याकरणावर अध्ययन प्रभुत्व मिळवण्यात अनेक समस्या असतात.

2) पूर्वमाध्यमिक स्तरावरील शिक्षक व्याकरणाचे अध्यापन पारंपारिक पद्धतीने करतात.

संशोधन परिकल्पना

1) संशोधकाद्वारे विकसित बहुमाध्यम अध्ययन अध्ययन संच, विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रभुत्वाकरता प्रभावी ठरते.

2) मराठी व्याकरणावर अध्ययन प्रभुत्वासाठी बहुमाध्यम अध्ययन संच प्रभावी/ परिणामकारक ठरते.

शुन्य परिकल्पना

1) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटातील पूर्वचाचणीच्या अध्ययन प्रभुत्वात सार्थ फरक नाही.

2) इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटातील पूर्वचाचणीच्या अध्ययन प्रभुत्वात सार्थ फरक नाही.

3) इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटातील पूर्वचाचणीच्या अध्ययन प्रभुत्वात सार्थ फरक नाही.

4) पूर्वमाध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटाच्या पूर्वचाचणीच्या अध्ययन प्रभुत्वात सार्थ फरक नाही.

5) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणीच्या अध्ययन प्रभुत्वात सार्थ फरक नाही.

6) इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणीच्या अध्ययन प्रभूत्वात सार्थ फरक नाही.

7) इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणीच्या अध्ययन प्रभुत्वात सार्थ फरक नाही.

8) पूर्वमाध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटाच्या उत्तरचाचणीच्या अध्ययन प्रभुत्वात सार्थ फरक नाही.

संशोधनाची व्याप्ती :

आशय व्याप्ती: प्रस्तुत संशोधनामध्ये पूर्वमाध्यमिक स्तरावरील मराठी व्याकरणाच्या अध्यापनाची सद्यस्थिती व विद्यार्थ्यांचे मराठी व्याकरणाचे अध्ययन प्रभुत्वातील समस्या आशय या पुरता व्यापक आहे.

क्षेत्र व्याप्ती: प्रस्तुत संशोधन अंबरनाथ तालुक्यातील मराठी पूर्वमाध्यमिक शाळांत पुरतेच व्यापक आहे. अंबरनाथ तालुक्यात शहरी व ग्रामीण अशा दोन्ही विभागात मराठी माध्यमाच्या पूर्वमाध्यमिक शाळा आहेत. संशोधनाची क्षेत्र व्याप्ती एवढीच आहे.

घटक व्याप्ती: संकल्पित संशोधन अंबरनाथ तालुक्यातील विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामीण व शहरी भागातील मराठी माध्यमाच्या शाळा या घटकांचा पुरतेच व्यापक आहे.

काळ व्याप्ती:

9 जुलै 2020ते जुलै 2023 म्हणजे तीन वर्षांचा कालावधी कालमर्यादा म्हणून संशोधनाकरिता गृहीत धरलेला आहे.

संशोधनाची मर्यादा

आशय मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे पूर्वमाध्यमिक स्तरावरील व्याकरणाच्या अध्यापनाची सद्यस्थिती व विद्यार्थ्यांचे व्याकरण प्रभुत्व यापुरतेच मर्यादित आहे.

क्षेत्र मर्यादा

प्रस्तुत संशोधन प्रस्तुत संशोधन अंबरनाथ तालुक्यातील मराठी पूर्वमाध्यमिक शाळा पुरतेच आहे. अंबरनाथ तालुक्यातील शहरी व ग्रामीण अशा दोन्ही विभागात ज्या मराठी माध्यमाच्या शाळा आहेत, हीच या संशोधनाची मर्यादा आहे.

घटक मर्यादा

संकल्पित संशोधन अंबरनाथ तालुक्यातील विद्यार्थी ,शिक्षक आणि ग्रामीण व शहरी भागातील मराठी माध्यमाच्या शाळा यापुरतेच मर्यादित असेल.

काल मर्यादा

जुलै 2020 ते जुलै 2023अशा तीन वर्षांच्या कालावधीत हे संशोधन पूर्ण करायचे आहे. ही कालमर्यादा या संशोधनात करतात ठरवलेली आहे.

परीमर्यादा

1) हे संशोधन पूर्वमाध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना पुरतेच मर्यादित आहे.

2) अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण व शहरी शाळेत पुरतीच संशोधन परीमर्यादित आहे.

संशोधन पद्धती

संशोधन समस्येची उत्तरे शोधताना संशोधनाच्या स्वरूपावरून, संशोधन पद्धती निश्चित करावी लागते. याकरता संशोधनाच्या विविध पद्धतींचा उपयोग केला जातो. त्या पुढील प्रमाणे:

1) सर्वेक्षण संशोधन पद्धती

2) ऐतिहासिक संशोधन पद्धती

3) प्रायोगिक संशोधन पद्धती

संकल्पित संशोधनाकरिता संशोधक सर्वेक्षण पद्धती व प्रायोगिक संशोधन पद्धती अशा मिश्र संशोधन पद्धतीच्या आधारे संशोधन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणार आहे.

जनसंख्या व नमुना निवड

जनसंख्या व नमुना निवड सर्वेक्षण संशोधनासाठी अंबरनाथ तालुक्यातील मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळांमधून मराठी विषयांचे अध्यापन करणाऱ्या 150 शिक्षकांची निवड सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात येईल. तसेच 500 विद्यार्थ्यांची सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात येईल.

प्रासंगिक नमुना निवड

या संशोधन पद्धतीत संशोधक आपल्या सोयीनुसार सहज उपलब्ध होतील अशा 70 विद्यार्थ्यांची 35 +35 नियंत्रित गट व प्रायोगिक गट म्हणून निवड करेल.

संशोधनाची साधने

सदर संशोधनासाठी संशोधक माहिती संकलनासाठी पुढील साधनांचा वापर करेल.

1) मराठी विषय शिक्षक मुलाखत प्रश्नसूची (संशोधक निर्मित).

2) मराठी अध्ययन प्रभुत्व पूर्वचाचणी प्रश्नावली (संशोधक निर्मित).

3) विद्यार्थी अध्ययन प्रभुत्व उत्तर चाचणी प्रश्नावली (संशोधक निर्मित).

4) बहुमाध्यमाधारित अध्ययन संचाची निर्मिती.

संख्याशास्त्रीय परिमाणे

सदर संशोधनासाठी संशोधक शेकडेवारी, मध्यमान, प्रमाण विचलन t परीक्षिका या संख्याशास्त्रीय साधनांचा माहिती विश्लेषणासाठी उपयोग करणार आहे.

संशोधनाची कार्यवाही

1) समस्या निश्चिती.

2) संबंधित संशोधनाचा आढावा.

3) उद्दिष्टानुसार अध्ययन साधन विकसित करणे.

4) प्रश्नावली तयार करणे.

अ)शिक्षक मुलाखत प्रश्नावली.

ब)विद्यार्थी पूर्वचाचणी प्रश्नावली.

क)विद्यार्थी उत्तर चाचणी प्रश्नावली.

5) नमुना निवड करणे.

6) नियंत्रित व प्रायोगिक असे गट तयार करणे.

7) साधनाद्वारे अध्ययन करण्यास वेळ देणे.

8) चाचणी चा डेटा दोन गटात विभागणी करणे.

9) त्या डेटा चे विश्लेषण करणे.

10) उत्तर उत्तर चाचणी ची तयारी करणे.

11) नियंत्रित व प्रायोगिक गट तयार करणे.

12) नियंत्रित गटास पारंपरिक पद्धतीने व प्रायोगिक गटास.

13) अध्ययन विकास साधनाद्वारे अध्ययन करण्याची संधी देणे.

14) पूर्व चाचणी उत्तर चाचणी या दोन्ही डाटाचे टेबल तयार करणे.

15) त्यांचे सांख्यिकी परिमाण काढणे.

16) त्यावरून विश्लेषण करणे व त्यावरून निष्कर्ष व शिफारशी लिहिणे.

वेळापत्रक

अ.क्र.	कालावधी	नियोजित कार्य
1	जुलै ते सप्टेंबर 2021	पूर्व साहित्याचे वाचन
2	ऑक्टोबर ते डिसेंबर 2021	पूर्व साहित्याचे वाचन, कोर्सवर्क, कोर्सवर्क परीक्षेचा अभ्यास
3	जानेवारी ते मार्च 2022	पूर्व साहित्याचे वाचन, कोर्सवर्क परीक्षा, संशोधन आराखडा
4	एप्रिल ते जून 2022	पूर्व साहित्याचे वाचन, संशोधन पेपर वाचन, चर्चासत्र सहभाग व तयारी
5	जुलै ते सप्टेंबर 2022	संशोधन पेपर वाचन, चर्चासत्र सहभाग व तयारी, प्रश्नावली निर्मिती
6	ऑक्टोबर ते डिसेंबर 2022	संशोधन पेपर वाचन, चर्चासत्र सहभाग व तयारी, क्षेत्र अभ्यास माहिती संकलन
7	जानेवारी ते मार्च 2023	चर्चासत्र सहभाग व तयारी, क्षेत्र अभ्यास माहिती संकलन,
8	एप्रिल ते जून 2023	चर्चासत्र शोध घेणे व तयारी करणे, क्षेत्र अभ्यास माहिती संकलन,
9	जुलै ते सप्टेंबर 2023	चर्चासत्र शोध घेणे व तयारी करणे, क्षेत्र अभ्यास माहिती संकलन,
10	ऑक्टोबर ते डिसेंबर 2023	संशोधन पेपर प्रकाशित करणे, संकलित माहितीचे विश्लेषण
11	जानेवारी ते मार्च 2024	संशोधन प्रबंध लेखन, सारांश लेखन,
12	एप्रिल ते जून 2024	सादरीकरण, पूर्व मुलाखतीची तयारी

आर्थिक नियोजन

अक्र.	विवरण	खर्च (रुपये)
1	नोंदणी शुल्क	600/
2	संशोधन विषयाशी संबंधित संशोधनाचा आढावा	5000/
3	इंटरनेटचा वापर	5000/
4	झेरॉक्स	5000/
5	पेन ड्राईव्ह	1500/
6	प्रिंट काढणे	1000/
7	कलर प्रिंट काढणे	1500/
8	संशोधन पेपर प्रकाशन	10000/
9	परिसंवाद कार्यशाळा सहभाग	5000/
10	टायपिंग फी	5000/
11	प्री व्हायवा	2000/
12	प्रबंध टायपिंग, बायडिंग, एम्बॉसिंग	10000/
13	प्रवास खर्च	15000/
14	निवास खर्च	15000/
15	भोजन खर्च	15000/
16	प्रबंध विद्यापीठास आठ प्रतीत सादर खर्च	5000/
17	अचानकपणे येणारा खर्च अंदाजे	10000/
एकूण खर्च		**1,11,600/**

संदर्भसूची

बापट ,भा .गो.(१९७७)शैक्षणिक संशोधन, पुणे :नित्यनूतन प्रकाशन.

भिंताडे, वि.रा .(२००६)शैक्षणिक संशोधन पद्धती ,पुणे: नित्य नूतन प्रकाशन.

बर्वे मीनाक्षी (२००६)संगणक शिक्षण व शिक्षक, पुणे :नित्य नूतन प्रकाशन .

फडके वासंती(१९८८) अध्यापनाची प्रतिमाने, पुणे नूतन प्रकाशन.

जगताप ह. ना .प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान ,पुणे: नित्य नूतन प्रकाशन.

कुंडले, म .बा .(१९६२)अध्यापन शास्त्र आणि पद्धति पुणे :व्हीनस प्रकाशन.

कुंडले, म .बा .(१९८६)शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

अवडंबर सुनीता लक्ष्मण (२०२१) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी व्याकरणाच्या अध्ययनासाठी मोबाईल ॲप्लिकेशन चे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास सावित्रीबाई फुले ,पुणे विद्यापीठ.३५३७२६.

कराकी फरहाना (२०१५) ए. एम. यु. विद्यापीठांतर्गत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणातील उपपदे व शब्दयोगी अव्यय यांच्या लेखनात होणाऱ्या चुकांचे विश्लेषण अलिगड मुस्लिम विद्यापीठ,१६३२५८.

किर्ती दिलीप चित्ते (२०२०) विमार्शी अध्यापन कार्यक्रमाचा बी.एड . विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन क्षमतांवर होणारा परिणाम अभ्यासणे ,श्री .ना .दा. ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई ३५९०१०.

किरण कुमार के. एस.(२०१३) ग्रामीण माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरण शिकण्यासाठी तयार केलेल्या मल्टीमीडिया पॅकेजची परिणामकारकता अभ्यासणे के. यु.व्ही. एम. पी. यु.विद्यापीठ १४९९०५.

के .कन्नम (२०१९)रामनाथपुरम मधील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व्याकरण अध्यापनाच्या प्रभावी पद्धतीची परिणामकारकता, मद्रास विद्यापीठ ३१०२४०.

पाटील रजनी शिवाजीराव (२०१०) मराठी भाषिकांचे इंग्रजी मधील उपपदे व शब्दयोगी अव्यय याचे संपादन एक अभ्यास डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद ७८७७७

नायडू ,चंद्रा. एस. (२०१४) इंग्रजी व्याकरणाचे अध्यापन करण्यासाठी मल्टीमीडिया पॅकेजचा विकास आणि परिणामकारकता काडी सर्व विद्यालय ४१५०६.

निवेदिता किशोर देशमुख (२००८) मराठी अध्यापनाच्या नाट्यीकरण व व्याख्यान पद्धतीच्या शैक्षणिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ३०९२४९.

रायकर शिवाजी मारुती(२००७) प्रथम स्तरावर मातृभाषा मराठी व्याकरणाच्या अध्यापनाची सांप्रत स्थिती आणि व्याकरणाच्या परिणामकारक अध्यापनासाठी अध्यापन कौशल्यांचा अभ्यास, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ३०५४३२.

सौ. स्मिता अशोक पाटील (१९९५)इयत्ता सातवी मधील विद्यार्थ्यांच्या मराठी व्याकरण विषयक संपादन संदर्भात बुगमन प्रतिमान व संबोध प्राप्ती प्रतिमान यांच्या परिणामकारकतेचा तौलनिक अभ्यास श्री नाद ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई १५४१२२.

जयकुमार,पी.(२०१९) चेन्नई जिल्ह्यातील शिक्षक विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणातील क्रियापदांचे अँड्रॉइड ॲप्लिकेशन द्वारे अध्यापन करणे एक प्रायोगिक अभ्यास व्ही .आय. टी .विद्यापीठ ३२९३९५.

संशोधक

कवठेकर अनिल सदाशिव

मार्गदर्शक

प्रा. डॉ.बाविस्कर चंद्रकांत राघो

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड